विभागीय कार्यालय, वालीव
वालीव नाका, वालिव, वसई (पूर्व)
ता.वसई, जि.पालघर.

दुरध्वनी : ०२५० २४५५०७६
०२५० २४५५१०४

जा.क्र.वविशम / ५०५ /२०१९-२०

दिनांक :- 02/03/2020

# जाहिर नोटीस

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी" वालीव कार्यक्षेत्रातील गाव मौजे राजावली येथील तलावाकरिता इच्छुक ठेकेदार/व्यावसाईक उदयोजक यांच्याकडून दि.१६/०३/२०२० रोजी पर्यंत खालील तक्त्यामधील नमुद तलावाकरिता किमान देकार निश्चित केलेला असून सदर किमान देयकावर सन २०२०/२१ ते २०२२/२३ या तीन वर्षा करिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | तलावाचे नाव | महानगरपालिकेने निश्चित केलेले किमान देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | सोनूदेवी | २९,९२०/- |
| २ | पि-याचा तलाव | ६१,११०/- |
| ३ | वनीचा तलाव | १,१२,१४५/- |

सदर कामाचे दरपत्रक सुचना दि. ०६/०३/२०२० रोजी पासून ते दि.१६/०३/२०२० रोजी पर्यंत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या(VVCMC.in) संकेत स्थळावर तसेच प्रभाग समिती "जी" कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येत आहे. दरपत्रक धारकांनी सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि.१६/०३/२०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती "जी" कार्यालयाच्या अंतर्गत राजावली कार्यालयात सादर करावे. प्राप्त झालेले दरपत्रक दि. १६/०३/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता शक्य झाल्यास ठेकेदार/प्रतिनिधी यांच्या समक्ष प्रभारी सहा.आयुक्त यांच्या दालनात उघडण्यात येतील.

## अटी शर्ती

१) उशिराने आलेले/अर्धवट भरलेले/खाडाखोड करुन सादर केलेले दर पत्रक फेटाळण्यात येतील.

२) दर पत्रकाचे लिफाफे सिल केलेले असावेत. एखादे सादर केलेले दरपत्रके विनंती अर्ज देऊनही परत घेता येणार नाही.

३) अभिकर्ता/ठेकेदाराने सदर मंजूर निविदा रक्कमेच्या ५०% रक्कम त्वरीत भरणा करावी लागेल. उर्वरीत ५०% रक्कम माहे ३१ डिसेंबर २०२० पर्यंत भरणा करावी लागेल.

४) दर लिफाफ्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

५) तलावात मत्स्य विज सोडून व मासे पकडणे, मारणे या कालावधीची मुदत दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०५/२०२३ या कालावधीसाठी राहील.

६) निविदामध्ये देकार रक्कम ठळक अक्षरात लिहीने आवश्यक आहे. खाडाखोड केलेली व साक्षांकित न केलेली निविदा रद्द करण्यात येईल.

७) मुदतीत प्राप्त झालेले दर पत्रक स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार प्र.सहा आयुक्त यांना राहील.

८) तलावातील मासळीवर देखरेख ठेवणेची जबाबदारी ठेकेदारची राहील.

९) तलाव महानगरपालिकेचा असून त्यावर निविदा धारकाचा कोणताही मालकी हक्क अगर वहीवाट हक्क राहणार नाही. तलाव फक्त मासळी उत्पादनासाठी देण्यात येत आहे.

१०) सदरचा तलाव मासळी उत्पादनासाठी उपरोक्त दिलेल्या मुदती पर्यंत आहे. मुदत संपल्यानंतर सदरचा तलाव निविदा धारकाकडून महानगरपालिका मार्फत ताब्यात घेण्यात येईल. त्यानंतर तलावातून मासळी पकडता येणार नाही. महानगरपालिकेस सदर तलावाची आवश्यकता असल्यास महानगरपालिका ठेका घेणा-याकडून सदर तलाव ताब्यात घेईल. त्या करिता नोटीस देऊन तलावाचा कब्जा महापालिकेने घेतल्यास ठेका घेणा-यास नुकसान भरपाई मागता येणार नाही किंवा त्याबाबत महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

११) तलावात सोडण्यासाठी लागणारे मत्स्य विज ठेका धारकास स्वखर्चाने खरेदी करावे लागेल. त्यासाठी लागणारी रक्कम महानगरपालिकेकडून दिली जाणार नाही.

१२) अतिवृष्टी अगर नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा अन्य कारणाने तलावामधील मासळी मरण पावल्यास व मासळीचे उत्पादन न झाल्यास ठेकेदारास कोणतीही नुकसान भरपाई महापालिकेकडे मागता येणार नाही.

१३) मासळी वाढविण्यासाठी तलावात टाकावयाचे खाद्य पदार्थ व मत्स्याची वाढ होणे करिता औषधे याच्यापासून पाणी दुषित होईल. आरोग्यास अपाय होईल असे कोणतेही पदार्थ वपरता येणार नाही. वापराचे पदार्थ महापालिकेचे



Scanned with CamScanner

विभागीय कार्यालय, वालीव
वालीव नाका, वालिव, वसई (पूर्व)
ता.वसई, जि.पालघर,

दुरध्वनी : ०२५० २४५५०७६
०२५० २४५५१०४

जा.क्र.वविशम / ५०५ /२०१९-२०

दिनांक :- 02/03/2020

आरोग्य निरिक्षकाकडून तपासणी करुन वापरले पाहिजे.

१४) महानगरपालिका हद्दीत नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे आर्थिक नुकसान झाल्यास महापालिकेकडून नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

१५) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला तलावाचा ठेका परस्पर हस्तांतर करता येणार नाही. तसे केल्याचे/अगर निदर्शनास आल्यास सदरचा ठेका तात्काळ रद्द करण्यात येईल.

१६) मंजूर झालेल्या ठेकेदारास योग्य त्या किंमतीचे स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करुन द्यावा लागेल.

१७) निविदा कालावधीत तलावातील मासे पकडताना कोणतीही जिवित व वित्तहानी झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१८) जादा देकार रक्कम नमुद करणा-या ठेकेदार/अभिकर्ता असेल. त्यांचा ठेका मंजूर करण्यात येईल.

१९) महानगरपालिकेच्या अटी व शर्ती ठेकेदारावर बंधनकारक असतील व महानगरपालिकेच्या अटी शर्तीचा भंग केल्यास ठेका रद्द करण्यात येऊन भरणा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल.

२०) वरील सर्व अटी व शर्तीचे पालन करावे लागेल.

प्र. सहा - आयुक्त
प्रभाग समिती "जी"
वसई - विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner